




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २१९ ●शनिवार, दि.०८ नोव्हेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955


# जरांगेंच्या आरोपांवरून धनंजय मुंडेंची थेट सीबीआय चौकशीची मागणी



## माझ्यासह सर्वांचीच नार्को सह ब्रेन मॅपिंग टेस्ट करा

### काय म्हणाले धनंजय मुंडे...

- मनोज जरांगेचे आरोप म्हणजे निव्वळ थोतांडगिरी, ओबीसी नेतृत्व संपवण्याचा डाव !
- जरांगे आणि त्याच्या टोळी पासून माझ्याही जीवाला धोका !
- ऑन एअर आम्हाला संपवून टाकण्याची भाषा करतात, तेव्हा सरकार कारवाई का करत नाही ?
- मनोज जरांगे यांना धनंजय मुंडे या पृथ्वीतलावरच नको आहे !
- संपवायची भाषा सोडा, आरक्षणाच्या मुद्द्यावर चर्चेला बसू...

**परळी वै.। प्रतिनिधी**

मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी आपल्यावर माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांच्यामार्फत घातपात केला जात असल्याचा आरोप केल्यानंतर धनंजय मुंडे यांनी त्यास प्रत्युत्तर देत थेट आरोप करणारे जरांगे, आरोपी आणि माझी स्वतःची देखील थेट सीबीआय मार्फत चौकशी केली जावी, त्याचबरोबर अशा प्रकारच्या आरोपांची सत्यता पडताळून सत्य महाराष्ट्राच्या जनतेच्या समोर यावे यासाठी ब्रेन मॅपिंग व नार्को टेस्ट करावी, असे आवाहन धनंजय मुंडे यांनी आज पत्रकार परिषदेत केले आहे.

मी मागील ३० वर्षांपासून समाजकारण आणि राजकारणामध्ये सक्रिय आहे. माझ्या समाजापेक्षा मराठा समाजात माझे मित्र व सहकारी जास्त आहेत, पहिल्यापासून मराठा समाजाच्या आरक्षणाच्या प्रत्येक लढ्यात मी बरोबरीने सहभाग घेतला. मात्र प्रथमच ओबीसी महा एल्गार मेळाव्यातून मी इडब्लूएस आरक्षण कसे अधिक फायद्याचे आहे यावरून बोललो तसेच ओबीसींच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या बाबतीत बोललो, तेव्हापासून मला कामापेक्षा जास्त टार्गेट केले जात आहे. ओबीसींच्या न्यायाची आणि गरजू व गरीब मराठा विद्यार्थ्यांची वैचारिक बाजु मांडली म्हणून मला संपवायला निघालेत, असा थेट आरोप धनंजय मुंडे यांनी केला.

**● मनोज जरांगे यांनी जे आरोपी म्हणून पुढे केले आहेत, ते त्यांचेच अनेक वर्ष जुने सहकारी आहेत. त्यातल्या एकावर मागील वर्षी एप्रिल महिन्यात हल्ला झाला तेव्हा जरांगेंनी त्याला पोलीस संरक्षण देण्याची मागणी केली होती, म्हणजे आपलेच जवळचे लोक पाठवायचे त्यांना कुणाच्या तरी मार्फत ओळख करून घ्यायला लावायचे, काहीतरी फेक रेकॉर्ड वगैरे बनवायचे आणि आरोप करून खळबळ उडवून एखाद्याची प्राणांतिक बदनामी करायची, हा कावा आता ओळखला आहे, त्यामुळे जरांगे यांनी केलेले आरोप म्हणजे निव्वळ थोतांडगिरी आहे असाही प्रत्यारोप धनंजय मुंडे यांनी केला आहे.**

आज घात पाताच्या गोष्टी करणाऱ्यांनी माणसात माणूस ठेवला नाही. झुंड आणि दादागिरी करून राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांना शिव्या, भुजबळ साहेबांना शिव्या, मला शिव्या, पंकजाताई ला शिव्या, लक्ष्मण हाकेंवर हल्ला, नवनाथ वाघमारे यांच्या वर हल्ला, त्या पवन करवरचा तर जीव घ्यायला निघाले होते, ते कुणाचे समर्थक होते? जीवघेणे हल्ले करून त्याचे समर्थन करत मारहाणीचा असुरी आनंद ▶▶ उर्वरित पान २ वर

# पार्थ पवार यांचा जमीन घोटाळा, अजित पवार यांनी राजीनामा द्यावा; वडेट्टीवार

**मुंबई । प्रतिनिधी**



पुण्यातील कोरेगाव पार्क येथील जमिनीची खरेदी करण्यात आली, त्यावर स्टॅम्प ड्यूटी माफ करण्यात आली आणि पुण्याचे पालकमंत्री असलेल्या अजित पवार यांना यातील काहीच माहित नव्हते? या जमीन घोटाळ्याप्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा राजीनामा झाला पाहिजे अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. एखाद प्रकरण झालं, ते अंगलट आले की उपमुख्यमंत्री अजित पवार हात झटकतात.. आता तर पुण्यातील जमिनीचे प्रकरण आहे, त्यांच्या मुलाने व्यवहार केला आहे, प्रकरण वाढल्यावर माझा याच्याशी संबंध नाही ▶▶ उर्वरित पान २ वर

# माझ्या नवऱ्याला महिन्यापासून दारु पाजून जरांगेविरुद्ध षडयंत्र रचलं, अमोल खुणेच्या बायको, आईने हंबरडा फोडला

**बीड । प्रतिनिधी**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषद घेत माजी मंत्री तथा राष्ट्रवादीचे आमदार धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. माझ्या हत्येचा कट धनंजय मुंडेंच्या सांगण्यावरुनच रचण्यात आल्याचं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. यामुळं सबंध राज्यात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी गेवराई येथून जालना पोलिसांनी दोन जणांना अटक केली आहे. गेवराई तालुक्यातील धानोरा येथील अमोल खुणे यांचा या अटकेत समावेश आहे. याबाबत अमोल खुणेच्या पत्नीने प्रतिक्रिया



दिली आहे, माझ्या नवऱ्याला महिन्यापासून दारु पाजून मनोज जरांगे यांच्या विरुद्ध षडयंत्र रचल्याची माहिती पत्नीने दिली आहे.

**● माझ्या पतीला या प्रकरणात अडकवलं जातंय, त्यांचा काहीही संबंध नाही**

मागील एक महिन्यापासून माझ्या पतीला दारु पाजत होते. त्या नशेमध्ये त्यांच्याकडून हे सगळं करून घेतलं जात होतं. मात्र माझे पती मराठा आंदोलक जरांगे पाटलांचे सुरुवातीपासून कार्यकर्ते आहेत. त्यांच्या मोबाईलमध्ये व स्टेटसला नेहमी जरांगे पाटलांचे फोटो असतात. ते जरांगे पाटलांना देव मानतात. माझ्या पतीला या प्रकरणात अडकवलं ▶ उर्वरित पान २ वर

# 6 लाख लाडक्या बहिणींचे ₹1500 बंद; आदिती तटकरेंनी कारणच सांगितलं

**मुंबई । प्रतिनिधी**

लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिला पुढच्या हप्त्याची वाट पाहत आहेत. दरम्यान, ऑक्टोबरचा हप्ता जमा होण्यास उशिर झाला आहे. त्यानंतर नोव्हेंबरच्या हप्त्याची वाट पाहत आहेत. लवकरच नोव्हेंबरचा हप्तादेखील जमा केला जाण्याची शक्यता आहे. त्याआधीच लाडकी बहीण योजनेबाबत एक महत्त्वाची



माहिती समोर आली आहे. लाडकी बहीण योजनेतून ६ लाख महिलांचा लाभ थांबवला आहे. लाडकी बहीण योजनेबाबत काल आदिती तटकरेंनी प्रतिक्रिया दिली होती. यावेळी त्यांनी सांगितले की, ६ लाख लाभार्थ्यांचे पैसे थांबवले आहे. लाडकी बहीण योजनेतून एकूण २६ लाख लाभार्थ्यांचे लाभ थांबवण्यात आले होते. त्यानंतर आता २० लाख लाभार्थ्यांचे लाभ सुरु करण्यात आला आहे. मात्र, अद्याप सहा लाख लाभार्थ्यांची ओळख ▶▶ उर्वरित पान २ वर

# मादळमोहीत बोगस डॉक्टरवर कारवाई ॲलोपॅथी उपचार करताना रंगेहाथ पकडले

**गेवराई । प्रतिनिधी**

तालुक्यातील मादळमोही येथे आरोग्य विभागाच्या पथकाने कारवाई करत ॲलोपॅथी उपचार करणाऱ्या बोगस डॉक्टरला पकडले. ही कारवाई ४ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १ वाजता करण्यात आली. अमलेंदु कुमार हरेन विश्वास, रा. मादळमोही हा व्यक्ती ॲक्युपंक्चर पद्धतीचा व्यवसायिक असूनही ॲलोपॅथी औषधांनी उपचार करत असल्याचे पथकाला अभिजीत क्लिनिकमध्ये दिसून आले. त्याने रुग्ण मलकाबाई पवार (रा. वंजारवाडी), शंकर खताळ (रा. इटकुर), सरस्वती तांबे आणि किर्ती डोंगरे (रा. काजळा) यांना सलाईन लावून बोगस उपचार केले.क्लिनिकची पाहणी केली असता तेथे नोंदणीशिवाय ९ खाटा (बेड) असल्याचे आढळले. विचारपूस केली असता विश्वास याने ॲलोपॅथीची प्रॅक्टीस करत असल्याची कबुली दिली. शासनमान्य वैद्यकीय परिषदांचे शैक्षणिक ▶ उर्वरित पान २ वर

# 'फलटण डॉक्टर युवती आत्महत्या प्रकरणी अतिरिक्त अधीक्षकांसह सात जणांचे पथक'

**सातारा । प्रतिनिधी**

फलटण येथील डॉक्टर युवती आत्महत्या प्रकरणातील विशेष तपास पथकाच्या अध्यक्षा तेजस्वी सातपुते यांनी सातारा, पुणे व सोलापूर ग्रामीणमधील एका अतिरिक्त अधीक्षकांसह सात जणांचे तपास पथक तयार केले आहे. युवती आत्महत्या प्रकरणामध्ये राजकीय दबाव असल्याचा



आरोप करत विरोधी पक्षांनी संपूर्ण राज्यातील वातावरण तापवले आहे. त्याचबरोबर बीड जिल्ह्यातील ▶ उर्वरित पान २ वर

# कोल्हापुरात ऊस दर आंदोलन चिघळलं

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

कोल्हापुरात ऊस दर आंदोलन चिघळलं आहे. दत्त दालमिया साखर कारखान्या विरोधात स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक झाली आहे. कारखाना समर्थकांनी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांना धमकी दिल्याचा आरोप करण्यात येत आहे. ऊस वाहतूक रोखून दाखवाच अशी धमकी देत कारखाना समर्थक शेतकऱ्यांच्या अंगावर धावून गेल्यानंतर शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. कार्यकर्ते आणि कारखाना समर्थकांमध्ये जोरदार हमरीतुमरी झाल्याचं पाहायाल मिळालं. मात्र, पोलिसांनी हस्तक्षेप वेळीच हस्तेक्षप केला. दत्त दालमिया साखर कारखान्याने एफआरपीची मोडतोड करून कारखाना सुरू केल्याने शेतकरी संघटनेने संपूर्ण ऊस वाहतूक रोखली आहे. यावेळी कारखाना समर्थकांना शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांना धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळं पुन्हा शेतकरी संघटनेचे ▶▶ उर्वरित पान २ वर

# २.५ कोटी कॅश, 9000 स्वेअर फूटचं घर आणि क्लास वन सरकारी नोकरी, या वर्ल्ड कप विजेती खेळाडूला लागली लॉटरी

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

भारताच्या महिला संघाने इतिहास रचला. कारण भारताच्या महिला संघाने प्रथमच वर्ल्ड कप जिंकला. या ऐतिहासिक काम गिरीनंतर भारतीय संघावर पैशांचा वर्षाव झाला. बीसीसीआयने ५१ कोटी रुपये दिले, तर आयसीसीने ४० कोटी रुपये दिले. पण भारताच्या एका खेळाडूला तर आता बंपर लॉटरीच लागली आहे. कारण आता या खेळाडूला



सरकारने अडीच कोटी रुपये रोख दिले आहेत, तर ९००० स्केअर फ ूटाचे घर दिले आहे, त्याचबरोबर क्लास वन सरकारी नोकरीही दिली आहे. त्यामुळे भारतामधील सर्वात मालामाल ही खेळाडू ठरली आहे.

भारताने वर्ल्ड कपच्या सेमी फायनलमध्ये जिथे ऑस्ट्रेलियाला पराभूत केले तिथेच खेळाडूंनी सर्वांची मनं जिंकली होती. जेमिमा रॉड्रीग्जने नाबाद शतक झळकावले आणि ▶▶ उर्वरित पान २ वर

# धारुरमध्ये किरकोळ कारणावरून युवकावर धारदार शस्त्राने हल्ला; एक गंभीर जखमी

**धारुर । प्रतिनिधी**



तालुक्यात अकरावीच्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या एका अल्पवयीन युवकाला दोघांनी मोटारसायकलवरून शेतात नेले आणि तेथे चौघांनी मिळून त्याला लोखंडी रॉड व चपलेने बेदम मारहाण केली. इतकेच नव्हे, तर त्याला माफी मागायला लावून त्याचा व्हिडिओ मोबाईलमध्ये काढला असल्याची संतापजनक घटना घडली आहे. याप्रकरणी चौघांविरुद्ध ॲट ॉसिटीसह मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.केज तालुक्यातील एकुरका येथील उमेश अशोक कोकाटे (वय १७) हा युवक सारणी (सांगवी) येथील विठ्ठल विद्यालय सारणी येथे अकरावी कला शाखेत शिक्षण घेत आहे. ३ नोव्हेंबर रोजी सकाळी १०:०० वाजता, उमेश आणि त्याची आई घरी असताना, त्यांच्या गावातील ओळखीचे सचिन अभिमान मोरे आणि गणेश तुळशिराम मोरे हे दोघे मोटारसायकलवरून त्याच्या घरी आले. त्यांनी उमेशला पेंडीचे पोते आणायचे आहे, तू आमच्यासोबत ▶▶ उर्वरित पान २ वर

# आधी कर्जबाजारी व्हायचं आणि मग... विखे पाटलांचे शेतकऱ्यांबाबत वादग्रस्त विधान

**पंढरपूर । प्रतिनिधी**

प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी काही दिवसांपूर्वी शेतकरी कर्जमाफीसाठी नागपूरमध्ये आंदोलन केले होते. या आंदोलनानंतर राज्य सरकारने ३० जून २०२६ पर्यंत कर्जमाफी करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. अशातच मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शेतकरी कर्जमाफी बाबत वादग्रस्त विधान केले आहे. या विधानामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरण्याची शक्यता आहे. राधाकृष्ण विखे पाटील यांनी नेमकं काय म्हटलं ते सविस्तर जाणून घेऊयात.



मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पंढरपूरमधील एका कार्यक्रमात बोलताना शेतकरी कर्जमाफीबाबत वादग्रस्त विधान केले आहे. सोसायटी काढायची, कर्ज घ्यायचे,कर्जबाजारी व्हायचं आणि पुन्हा कर्जमाफीची मागणी करायची असं विखे पाटील यांनी केले आहे. चूक लक्षात येताच त्यांनी 'आपल्या महायुती सरकारने कर्जमाफी जाहीरच केली आहे, आपण शेतकऱ्यांची शंभर टक्के कर्जमाफी करणार आहोत' असं म्हटलं आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे सध्या नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करत आहेत. यावर बोलताना विखे पाटील यांनी, 'कोविडच्या काळामध्ये दोन अडीच वर्षे उद्धव ठाकरे कुठे होते? ते माझं कुटुंब तुमची जबाबदारी म्हणतं लोकांना वाऱ्यावर सोडत घरात बसले होते आणि आता मराठवाड्यात शेतकऱ्यांना दिलासा द्यायला फिरत आहेत' अशी टीका उद्धव ठाकरे यांच्यावर केली आहे. बच्चू कडू यांनी शेतकरी कर्जमाफीसाठी रस्त्यावर ▶▶ उर्वरित पान २ वर




# नप सार्वत्रिक निवडणूक-2025 काय करावे व काय करु नये मार्गदर्शक सूचना जारी

● काय करावे:- चालू असलेले कार्यक्रम/योजना पुढे सुरु ठेवता येतील. ज्याविषयी शंका निर्माण होईल अशा बाबींच्या संबंधात, राज्य निवडणूक आयोग/महानगरपालिका आयुक्त/जिल्हाधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण/मान्यता प्राप्त करण्यात यावी. पूर, अवर्षण, साथीचे रोग किंवा अन्य नैसर्गिक आपत्ती यामुळे बाधित झालेल्या क्षेत्रातील जनतेसाठी साह्यकारी व पुनर्वसनाच्या उपाययोजना चालू करता येतील व या संदर्भात चालू असलेल्या योजना पुढे सुरु ठेवता येतील. मरणासन्न किंवा गंभीररित्या आजारी असलेल्या व्यक्तींना रोख रक्कम किंवा वैद्यकीय सवलती देण्याचे समूचित मान्यतेने पुढे चालू ठेवता येईल. मैदानासारख्या सार्वजनिक जागा सर्व पक्षांना/ निवडणुकीत उभे असलेल्या उमेदवारांना निवडणूक सभा घेण्यासाठी निःपक्षपातीपणे उपलब्ध करुन दिल्या पाहिजे. त्याचप्रमाणे सर्व पक्षांना/ निवडणुकीस उभे असलेल्या उमेदवारांना हेलिपॅडच्या वापर निःपक्षपातीपणे उपलब्ध करुन दिला पाहिजे. विश्रामगृहे, डाकबंगले व इतर शासकीय निवासस्थाने वगैरे बाबतीत निवडणूक आयोगाने व त्या अनुषंगाने शासनाने काढलेल्या आदेशास संपूर्णतः अधीन राहून सर्व राजकीय पक्षांना व निवडणुकीस उभे असलेल्या सर्व उमेदवारांना समानतेच्या तत्त्वावर उपलब्ध करुन देता येणे अनुज्ञेय असल्यास त्याप्रमाणे देण्यात यावेत. इतर राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांच्यावर करण्यात देणारी टीका ही त्यांची धोरणे, कार्यक्रम, पूर्वीची कामगिरी, पार पडलेली कामे, केवळ या बाबींशी संबंधित असावी. शांततामय व उपद्रवरहित गृहस्थ जीवन जगण्याच्या प्रत्येक व्यक्तीच्या अधिकाराचे पूर्णपणे जतन करण्यात यावे. प्रस्तावित सभेची जागा व वेळ याविषयी स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना पूर्ण माहिती देण्यात यावी आणि त्यासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या मिळविण्यात याव्यात. प्रस्तावित सभेच्या जागी निर्बंधात्मक व प्रतिबंधक आदेश जारी केलेले असल्यास त्यांचे पूर्णपणे पालन करण्यात यावे. आवश्यक असल्यास त्याबाबत सवलत मिळण्याविषयी अर्ज केले पाहिजेत व वेळीच अशी सवलत मिळविली पाहिजे. प्रस्तावित सभेसाठी ध्वनिक्षेपक (Loudspeaker) किंवा कोणत्याही इतर अशा




सवलतीचा वापर करण्यासाठी योग्य परवानगी मिळविली पाहिजे. सभेमध्ये अडथळे आणणाऱ्या किंवा अव्यवस्था निर्माण करणाऱ्या व्यक्तींना प्रतिबंध करण्यासाठी पोलिसांचे सहाय्य मिळविण्यात यावे. कोणत्याही मिरवणुकीची प्रारंभीची वेळ व जागा, मिरवणूक ज्या मार्गाने जाईल तो मार्ग व मिरवणुकीची अखेर होईल अशी वेळ व स्थान ही बाब आगाऊ स्वरुपात निश्चितपणे ठरविण्यात यावी व पोलीस प्राधिकाऱ्यांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घेण्यात यावी. मिरवणूक ज्या वस्तीमधून जात असेल त्या वस्त्यांबाबत कोणतेही निर्बंधात्मक आदेश जारी केलेले असल्यास त्या विषयी खात्री करुन त्याचे पूर्णपणे अनुपालन करण्यात यावे. त्याचप्रमाणे सर्व वाहतूक नियमांचे व अन्य निर्बंधांचे अनुपालन करण्यात यावे. मिरवणुकीमुळे वाहतुकीत कोणताही अडथळा निर्माण होऊ देऊ नये. ज्यांचा क्षेपके किंवा हत्यारे म्हणून गैरवापर होऊ शकेल अशा कोणत्याही वस्तू मिरवणुकीत सहभागी असलेल्या व्यक्तींनी बाळगू नयेत. मतदानाचे काम शांतता व सुव्यवस्थेने पार पडावे यासाठी सर्वतोपरी सर्व निवडणूक अधिकाऱ्यांना सहकार्य देण्यात यावे. उमेदवार व त्याच्या अधिकृत कार्यकर्त्यांनी विहित परवानगी घेऊन योग्य असे बिल्ले व ओळखपत्रे, निवडणूक प्रशासनाकडून मिळवावीत व ती निवडणुकीचे काम करणाऱ्या व्यक्तींनी ती दर्शनी भागावर लावावीत. मतदारांना देण्यात येणाऱ्या ओळखचिठ्ठया साध्या (पांढऱ्या कागदावर देण्यात येतील य त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे किंवा पक्षाचे नाव यांचा निर्देश असणार नाही. मतदानाच्या दिवशी वाहनांच्या वापरावरील निर्बंधांचे पूर्णपणे पालन करण्यात यावे. राज्य निवडणूक आयोगाचे, महानगरपालिका आयुक्त यांचे अथवा जिल्हाधिकाऱ्यांचे किंवा त्यांनी प्रधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने दिलेले वैध प्राधिकारपत्र असल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस कोणत्याहीवेळी मतदान कक्षात प्रवेश करता येणार नाही. वरच्या दर्जाच्या कोणत्याही व्यक्तींना (उदा. मुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री, संसद सदस्य, विधानसभा सदस्य, विधानपरिषद सदस्य) यांनाही यातून सूट देण्यात आलेली नाही. निवडणूक पार पाडण्याच्या संबंधातील कोणतीही तक्रार किंवा समस्या, निवडणूक निर्णय अधिकारी/ क्षेत्र/प्रभाग दंडाधिकारी यांच्या किंवा राज्य निवडणूक आयोग यांनी नियुक्त केलेल्या निरीक्षकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी. राज्य निवडणूक आयोग/ आयुक्त, महानगरपालिका/ जिल्हाधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी यांचे निवडणुकीच्या विविध पैलूंच्या संबंधातील सर्व बाबींविषयीचे निर्देश/ आदेश/अनुदेश यांचे पालन करण्यात यावे.

● काय करु नये- शासकीय वाहने किंवा कर्मचारी वर्ग किंवा यंत्रणा यांचा निवडणूक प्रचारविषयक कामासाठी वापर करण्यात येऊ नये. शासकीय वाहनात पुढील कार्यालयाच्या वाहनाचा समावेश असेलः- केंद्र शासन, राज्य शासन, केंद्र व राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे, केंद्र शासन व राज्य शासनाच्या संयुक्त क्षेत्रातील उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका, नगर परिषदा/नगर पंचायती, पणन मंडळ (कोणत्याही नावाचे), सहकारी संस्था, जिल्हा परिषदा/ पंचायत समित्या/ ग्रामपंचायती, ज्यामध्ये सार्वजनिक निधी मग तो एकूण निधीच्या हिश्यातील कितीही अल्पांशाने असो गुंतवण्यात आला आहे अशी कोणतीही संस्था व संरक्षण मंत्रालय, गृह मंत्रालय, राज्य शासन, केंद्रीय पोलीस संघटना इत्यादीच्या मालकीची असलेली पुढील वाहने-मालमोटारी, लॉरी, टेंपो, जीपगाड्या, मोटारगाड्या, ऑटोरिक्षा, बसगाड्या, विमाने, हेलिकॉप्टर, जहाजे, बोटी, हॉवर क्रॉफ्ट व इतर सर्व वाहने. सत्तेमध्ये असलेला पक्ष/शासन यांनी साध्य केलेल्या उद्दीष्टांबाबत सरकारी कोषागाराच्या खर्चाने कोणतीही जाहिरात देऊ नये. कोणत्याही वित्तीय अनुदानाची घोषण करणे, कोनशिला बसविणे, नवीन रस्ते इ. बांधण्याचे वचन देणे इत्यादी गोष्टी करु नयेत. शासन/सार्वजनिक उपक्रम यांच्या सेवेत कोणत्याही तदर्थ (Ad hoc) नियुक्त्या करु नयेत. मंत्री (राज्यमंत्री व उपमंत्रीसहित) हे उमेदवार असल्याखेरीज किंवा प्राधिकृत प्रतिनिधी असल्याखेरीज किंवा मतदानासाठी मतदार या नात्याने असेल त्याखेरीज मतदान कक्षामध्ये किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करणार नाहीत. निवडणूक मोहिम/प्रचार यांच्या जोडीने कोणतेही सरकारी कान पार पाडण्यात येऊ नये. मतदारास आर्थिक किंवा अन्य प्रकारचे कोणतेही प्रलोभन दाखविण्यात येऊ नये. मतदाराच्या जातीय व धार्मिक भावनांना आवाहन करण्यात येऊ नये. विभिन्न जाती, जमाती यांच्यातील किंवा धार्मिक किंवा भाषिक गटातील मतभेद ज्यामुळे अधिक तीव्र होतील किंवा परस्परातील वैमनस्य वाढेल किंवा त्यांच्यात तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करण्याचा प्रयत्न करण्यात येऊ नये. इतर पक्षांचे कोणतेही नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक कार्याशी संबंधित नसेल अशा त्यांच्या खाजगी जीवनातील कोणत्याही पैलूवर टीका करण्याची परवानगी देण्यात येऊ नये. ज्यांचा खरेखोटेपणा पडताळून पाहिलेला नाही असे आरोप ठेवून किंवा त्यास विकृत स्वरुप देऊन इतर पक्ष किंवा त्यांचे कार्यकर्ते यांच्यावर टीका करण्यात येऊ नये. निवडणूक प्रचार तसेच भाषणे, निवडणूक प्रचाराचे फलक, संगीत इत्यादी साठी कोणत्याही प्रार्थनास्थळांचा वापर करण्यात येऊ नये. लाच देणे, आवजवी प्रभाव टाकणे, मतदारांना धाकदपटशा दाखविणे, खोट्या नावाने मतदान करणे, मतदारांना मतदान कक्षापर्यंत पोहोचविणे व तेथून परत नेणे यासारख्या भ्रष्ट प्रथा किंवा निवडणूक विषयक अपराध करण्यास प्रतिबंध आहेत. व्यक्तींची मते किंवा कृत्ये याविरुध्द निषेध व्यक्त करण्यासाठी त्यांच्या घरासमोर निदर्शने किंवा धरणे धरण्यात येऊ नये. कोणत्याही व्यक्तीला, अन्य कोणत्याही व्यक्तीची जमीन, इमारत आवारभिंत इत्यादींचा वापर त्यांच्या मालकांच्या परवानगीखेरीज करणे, ध्वजदंड उभारणे, कापडी फलक लावणे, नोटीशी चिकटविणे किंवा घोषणा लिहिणे इत्यादी करता येणार नाही. यामध्ये शासकीय, सार्वजनिक व खाजगी जागांचा समावेश असेल. इतर राजकीय पक्षांच्या किंवा उमेदवारांच्या सार्वजनिक सभांमध्ये किंवा मिरवणुकीत कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करण्यात येऊ नये. एका पक्षाची जेथे सभा चालू असेल अशा जागी दुसऱ्या पक्षाद्वारे मिरवणूक काढण्यात येऊ नये. दुसऱ्या पक्षांनी किंवा उमेदवारांनी लावलेली प्रचारपत्रके, भित्तीपत्रके काढून टाकण्यात येऊ नयेत. मात्र याबाबत काही आक्षेप असल्यास पोलिसांच्या किंवा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निदर्शनास आणावे. मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठया वितरीत करण्याच्या जागी किंवा मतदान कक्षाजवळ प्रचारपत्रके, पक्षांचे ध्वज, चिन्हे किंवा इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करु नये. ध्वनिक्षेपकांचा मग ते एकाच जागी लावलेले असोत किंवा फिरत्या वाहनांवर बसविलेले असोत, सकाळी 6.00 वाजण्यापूर्वी किंवा रात्री 10.00 वाजल्यानंतर आणि संबंधित प्राधिकाऱ्यांची लेखी पूर्वपरवानगी घेतलेली असल्याखेरीज वापर करु नये. तसेच याबाबत असलेले The Noise Pollution (Regulation and Control) Rules, 2000 ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच संबंधित प्राधिकाऱ्यांची लेखी पूर्वपरवानगी असल्याखेरीज सार्वजनिक सभेच्या जागी किंवा मिरवणुकीत किंवा प्रचारफेरीत ध्वनिक्षेपकाचा वापर करु नये. अशा सभा/ प्रचारफेरी रात्री 10.00 वाजल्यानंतर चालू ठेवण्याची परवानगी देण्यात येणार नाही. याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन व्हावे तसेच घालून दिलेल्या अटींचे पालन करावे. याखेरीज, ती स्थानिक कायदे, त्या क्षेत्रातील सुरक्षिततेच्या आवश्यकतेचा स्थानिक दृष्टीकोन आणि हवामान, सणासुदीचे दिवस, परिक्षेचा काळ यांच्या अधीनतेने असतील. निवडणुकीच्या काळात कोणत्याही प्रकारच्या पैशाचे, मद्याचे, वस्तूंचे वाटप करण्यात येऊ नये. -

- **मनोज सुमन शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी,**

◆ पान 9 वरून पुढे...

## जरांगेंच्या आरोपांवरून....

घेणारे लोक तुमचेच होते, असा घणाघात करत धनंजय मुंडे यांनी आणखी एक मुद्दा उपस्थित केला. मनोज जरांगे ऑन एअर धनंजय मुंडे संपवून टाकतो, त्याचा नायनाट करतो, त्याची संपूर्ण जात संपवून टाकतो, ओबीसी नेत्यांना संपवून टाकतो, ब्राम्हणांना संपवून टाकतो, अशी उघड धमकी दिली जाते, ही धमकी नाही का? त्यावर सरकार कारवाई करणार नाही का? सरकार त्यांचे सर्व काही ऐकते मग आम्ही ओबीसी म्हणून आम्हाला किंमत नाही का? असा सवाल करताना धनंजय मुंडे यांनी जरांगेना आव्हान देत मला गोळ्या घालून मारून टाका, माझा समाज, ओबीसी समाज सगळ्यांना गोळ्या घालून मारून टाका आणि तुम्ही एकटेच राज्य करा, असे भावनिक आवाहन केले. छत्रपती शिवाजी महाराजांनी घालून दिलेला गावगाडा, सामाजिक विन विस्कटनार नाही यासाठी अनेकवेळा आरोप होऊन देखील मी गप्प राहिलो, जरांगे यांना सरकारचा प्रतिनिधी म्हणून दोनदा भेटलो, पण कधीच त्यांना कुठे विरोध केला नाही, विरोध हा केवळ आरक्षणाच्या विचारापुरता मर्यादित होता मात्र मनोज जरंगे या व्यक्तीला धनंजय मुंडे हा व्यक्ती पृथ्वीतलावर जिवंत नको आहे असे वाटते असे धक्कादायक विधान धनंजय मुंडे यांनी केले. त्याचबरोबर मनोज जरांगे आणि त्यांच्या वाळू माफिया टोळी कडून आपल्याही जीवाला धोका असल्याचे धनंजय मुंडे यांनी यावेळी म्हटले. मनोज जरांगे यांना काही नेत्यांनी झेड प्लस दर्जाची सुरक्षा देण्याची मागणी केली आहे, मी तर या पत्रकार परिषद व्दारे या संपूर्ण प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याबरोबरच देशातील सर्वात सेफ समजली जाणारी एसपीजी सुरक्षा जरांगेना द्यावी, अशी म ागणी सरकारकडे करतो, सोबतच ओबीसी समाजाच्या लढ्यातील छगन भुजबळ साहेब, गोपीचंद पडळकर साहेब, लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे, किंवा माझ्यासारखा सामान्य कार्यकर्ता अशा लोकांचे जीव वाचावेत, याचीही काळजी सरकारने घ्यावी आणि राहिला विषय मला संपवायचा तर इथल्या मातीतील लोकांच्या पदरी माझ्या आई वडिलांनी मला वाहिलेले आहे, त्यामुळे लोकांच्या मध्ये राहून माझा जीव गेला तरी मला फरक पडत नाही, असे भावनिक विधान धनंजय मुंडे यांनी केले आहे. दरम्यान तुमचेच लोक प्लॅन करून पाठवून त्यांनी ओळखी करायच्या काहीतरी कामे सांगायची, गाड्या तर मला अनेकजण मागतात, अनेक आंदोलने झाली तेव्हा मी अनेकांना गाड्यांची व्यवस्था करून दिली आहे, त्याचा अर्थ जीव घेण्याची प्लॅनिंग? म्हणजे निव्वळ थोतांडगिरी आहे, असे सांगताना आजकाल ए आई तंत्रज्ञानाने काहीही बनावट केले जाते, त्यामुळे काही बनावट रेकॉर्डिंग, व्हिडीओ किंवा काही तयार करून माझ्यावर एका सम ाजाकडून हल्ले घडवून आणण्याचा व मला संपवण्याचा हा कट असल्याचे धनंजय मुंडे यांनी यावेळी स्पष्ट केले. त्यामुळे आता या प्रकरणातील संपूर्ण सत्य बाहेर यावे, तोपर्यंत मी स्वस्थ बसणार नाही आणि बसुही देणार नाही,

◆ पान 9 वरून पुढे...

असेही धनंजय मुंडे यांनी ठासून सांगितले. यावेळी माजी आ. संजय भाऊ दौंड, ज्येष्ठ नेते दत्ता आबा पाटील, युवक नेते अजय मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेस परळीचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, परळीचे शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, शकील कुरेशी, सूर्यभान नाना मुंडे, पिंटू मुंडे, प्रा. मधुकर आगाव, विनोद जगतकर, राजाभाऊ पोळ, लक्ष्मण पोळ, अय्युब भाई, माणिक भाऊ फड, अनंत इंगळे यांसह पदाधिकारी आदी उपस्थित होते.

## पार्थ पवार...

अस बोलून उपमुख्यमंत्री अजित पवार जबाबदारी झटकू शकत नाही अशी टीका वडेट्टीवार यांनी केली.पुण्यातील जमीन घोटाळा प्रकरणी अमेडिया कंपनीने व्यवहार केला. या कंपनीत पार्थ पवार पार्टनर आहेत, त्यांच्या सह्या आहेत मग गुन्हा फक्त दिग्विजय पाटील वर का दाखल झाला? महायुती सरकार म्हणजे तू खा, मी ही खातो आणि एकमेकांना वाचवू अस संगनम ताने काम सुरू आहे अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी आज नागपुरात म ाध्यमांशी बोलताना केली. पुणे जमीन घोटाळाप्रकरणी आता सांगण्यात येत आहे की दिग्विजय पाटील याला व्यवहार करण्यासाठी अधिकार देण्यात आले होते,पण व्यवहार करायला पैसे आले कुठून? व्यवहार कुणामुळे झाला? कुणामुळे स्टॅम्प ड्युटी माफ झाली? पार्थ पवार यांना वाचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत, त्यामुळे या प्रकरणी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली पाहिजे या प्रकरणाशी सबंधित म हसूल विभागाचे अधिकारी,उद्योग संचानालय,शीतल तेजवानी सगळ्यांची चौकशी झाली पाहिजे अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली.

## माझ्या नवऱ्याला....

जात आहे. त्यांचा काहीही संबंध नाही, असा धक्कादायक दावा आरोपी अम ोल खुणे याची पत्नी आणि आईने केला आहे. त्यामुळं या प्रकरणात ट्विस्ट निर्माण झाला आहे. माझ्या मुलाचा या प्रकरणात काहीही संबंध नाही, असे म्हणत अमोल खुणेच्या आईला अश्रू अनावर झाल्याचं पाहायला मिळालं. याप्रकरणी आम्हाला न्याय द्यावा, अशी मागणी कुटुंबीयांनी केली आहे.

## 6 लाख लाडक्या....

पटलेली नाही. त्यांना फोन करुन तसेच त्यांच्या पत्त्यावर पोहचून त्यांची पडताळणी करण्यात येत आहे. त्यांची पडताळणी पूर्ण झाल्यानंतरच महिलांना लाभ मिळणार आहे. लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना केवायसीसाठी मुदत देण्यात आली आहे. महिलांना १८ नोव्हेंबरपर्यंत केवायसी करायचे आहे. जर तुम्ही केवायसी केले नाही तर तुम्हाला यापुढे योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे महिलांना लवकरात लवकर ऑनलाइन पद्धतीने केवायसी करण्याचे आवाहन केले आहे.

◆ पान 9 वरून पुढे...

## मादळमोहीत बोगस...

व नोंदणी प्रमाणपत्र त्याच्याकडे आढळले नाही. ही कारवाई वैद्यकीय अधिकारी अरुण आप्पासाहेब लौकरे यांच्या फिर्यादीवरून करण्यात आली. पथकात पी. के. पिंगळे (जिल्हा सर्वेक्षण अधिकारी, आरोग्य विभाग बीड), अभय गौदीकर (तालुका आरोग्य अधिकारी गेवराई), साजिद शेख, झेड. टी. सय्यद आणि यादव बी. एम. हे अधिकारी सहभागी होते. या प्रकरणी अमलेंदु कुमार हरेन विश्वास याच्याविरुद्ध कलम ३३(१), ३३(२) महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय कायदा १९६१ अंतर्गत गेवराई पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवला गेला असून पुढील तपास अभय गौदीकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरूआहे.

## 'फलटण डॉक्टर...

लोकप्रतिनिधींनीही तपासाबाबत प्रश्न उपस्थित केले होते. याची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणामध्ये राज्य राखीव पोलिस दलाच्या समादेशक तेजस्वी सातपुते यांची एसआयटी अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली. त्यानंतर श्रीमती सातपुते यांनी तातडीने साताऱ्यात येत प्रकरणाची संपूर्ण माहिती घेत कागदपत्रांची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी या विशेष तपास पथकात सात जणांची नियुक्ती केली आहे. श्रीमती सातपुते यांनी या गुन्ह्याचा तपास पुणे ग्रामीणचे अतिरिक्त पोलिस अधीक्षक गणेश बिराजदार यांच्याकडे दिला आहे. त्याचबरोबर त्यांना तपासात मदत करण्यासाठी सहायक तपासी अधिकारी म्हणून यापूर्वी हा तपास पाहत असलेले फलटणचे उपअधीक्षक विशाल खांबे, लोणावळा पोलिस ठाण्याचे सहायक निरीक्षक राहुल लाड, कऱ्हाड तालुका पोलिस ठाण्याचे सहायक निरीक्षक सखाराम बिराजदार, सोलापूर ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे सहायक निरीक्षक विशाल वायकर, सातारा तालुका पोलिस ठाण्याचे निरीक्षक अभिजित गुरव, तसेच पुणे ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे उपनिरीक्षक अभिजित सावंत यांची नियुक्त केली आहे. विशेष तपास पथकामध्ये अधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे डॉक्टर युवती आत्म हत्या प्रकरणाच्या तपासाला गती येणार आहे.

## कोल्हापुरात ऊस....

कार्यकर्ते आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळं दोन्हीकडील कार्यकर्त्यांमध्ये चांगलीच बाचाबाची झाल्याची पाहायला मिळालं.

## २.५ कोटी कॅश...

संघाच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला. त्यानंतर भारत फायनलमध्ये पोहोचला. भारताचा फायनलमध्ये सामना दक्षिण आफ्रिकेशी होणार होता. यापूर्वी दक्षिण आफ्रिकेने भारताला वर्ल्ड कपच्या साखळी फेरीत पराभूत

◆ पान 9 वरून पुढे...

केले होते. पण अंतिम फेरीत भारतीय संघाने त्या पराभवाचा वचपा काढला आणि वर्ल्ड कप जिंकला. या वर्ल्ड कप विजयानंतर वर्ल्ड कप संघांतील खेळाडूंवर पैशांचा वर्षाव होत आहे. पण भारताची एक खेळाडू तर चांगलीच नशिबवान ठरली आहे. कारण या खेळाडूला आता राज्य सरकारने चांगलेच मालामाल केले आहे. आंध्र प्रदेशचे सरकार कधीही खेळाडूंचा सन्मान करण्यासाठी सरसावलेले असते. आता महिलांच्या वर्ल्ड कपनंतरही आंध्र प्रदेशच्या सरकारने आपला खेळाडूला चांगलेच मालामाल केले आहे. आंध्रप्रदेश सरकारने अडीच कोटी रोख, ९००० हजार स्केअरफूटचे घर आणि क्लास वन पदाची सरकारी नोकरी भारताच्या वर्ल्ड कप संघातील श्री चरणी या खेळाडूला दिला आहे. भारतीय या वर्ल्ड कपमध्ये अडचणीत सापडला होता, त्यावेळी श्री चरणीने संघाला विकेट्स मिळवून देण्याची महत्वाची भूमिका बजावली होती. त्यामुळे भारताच्या या विजयातही तिचा मोलाचा वाटा होता. त्यामुळे आता वर्ल्ड कप जिंकल्यावर तिला राज्य सरकारने चांगलेच बक्षिस दिले आहे.

## धारुरमध्ये किरकोळ....

चल असे म्हटले. उमेशने त्यांना नकार दिला असता, त्यांनी त्याच्याशी ओढाओढी सुरू केली. उमेशची आई तिथे आली आणि तिने तुम्ही त्याच्यासोबत अशी झटापट का करता? असे विचारताच, त्या दोघांनी उमेशच्या आईला ढकलून दिले, ज्यामुळे त्या खाली पडल्या आणि त्यांचे कपडे फाटले. त्यानंतर त्यांनी उमेशला, तुझे वडील आमच्या शेतात आहेत, तेथे एक काम आहे, तू आमच्यासोबत चल असे सांगितले आणि बळजबरीने त्याला मोटारसायकलवर दोघांच्यामध्ये बसवून शेतात घेऊन गेले.शेतात पोहोचल्यानंतर सचिन मोरेने गाडी थांबवताच उमेशला गाडीवरून ढकलून दिले. उमेश खाली पडताच त्या दोघांनी त्याला अभिमान मोरे आणि तुळशिराम मोरे (दोघेही रा. एकुरका) यांच्यासमोर नेले. या चौघांनी मिळून उमेशला जातीवाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. तुळशिराम मोरे याने सचिन मोरेच्या हातातील लोखंडी रॉड आणि चपलेने त्याला बेदम मारहाण केली. याप्रकरणी उमेश कोकाटे याने ४ नोव्हेंबर रोजी केज पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार, सचिन अभिमान मोरे, गणेश तुळशिराम मोरे, अभिमान मच्छिंद्र मोरे आणि तुळशिराम केशव मोरे (सर्व रा. एकुरका, ता. केज) यांच्याविरुद्ध गु. र. नं. ६०८/२०२५ नुसार अॅट्रॉसिटी कलम ३(१)(आर), ३(१)(एस), ३(२)(व्ही ए) सह भारतीय न्याय संहिता (भा. न्या. सं.) कलम ११५(२), ११८(१), ३५१(२), ३५२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आधी कर्जबाजारी....

उतरून आंदोलन केले होते. या आंदोलनाची दखल घेत सरकारने कर्जमाफीची घोषणा केली आहे. ३० जून २०२६ पर्यंत शेकऱ्यांचा सातबारा कोरा होणार आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## गेवराई नगराध्यक्ष...

सवाल उपस्थित करून ते म्हणाले की, मुस्लिम समाजासाठी आ. विजयसिंह पंडित यांनी दहा महिन्यांत दोन कोटी रुपये किंमतीचा भव्य शादीखाना मंजुर केला, दहा वर्षे यांच्या पाठिशी मुस्लिम समाज राहिला परंतु त्यांनी समाजाला काही दिले नाही, दहा वर्षांत त्यांना बसस्टँड समोरील नाली करता आली नाही ते शहराचा विकास काय करतील? असा सवालही महेश दाभाडे यांनी यावेळी केला. त्यांच्या भाषणाला उपस्थितांनी मोठा प्रतिसाद दिला. यावेळी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांनी आपल्या भाषणात सौ.शितलताई महेश दाभाडे यांची नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारीची अधिकृत घोषणा केली. आपल्या हक्काचा माणूस म्हणून शहरातील नागरीक महेश दाभाडे यांच्याकडे पाहतात. लोकांच्या अडीअडचणीमध्ये ते सदैव उभे आहेत. नगराध्यक्ष पदाचा त्यांना अनुभव आहे. त्यामुळेच सौ.शितलताई यांना उमेदवारी दिल्याचे सांगून प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन केले. पंडित मुक्त म्हणणारे कधी पंडित युक्त झाले हे कळले नाही अशी खोचक टिका अमरसिंह पंडित यांनी आपल्या भाषणात केली. सुभाष महाराज नागरे, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कालिदास नवले, ज्येष्ठ नेते एस.वाय.अन्सारी यांनी यावेही आपले मनोगत व्यक्त करून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाला शिवाजीनगर भागातील नागरीकांची मोठी उपस्थिती होती.

## परिक्षा केद्राच्या....

मनाई आदेश लागू करण्यात आले असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ मधील शक्तीचा वापर करुन

◆ पान ४ वरून पुढे...

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दि.०९ नोव्हेबर २०२५ रोजी घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ अनुषंगाने वरील प्रमाणे परीक्षा उपकेंद्रांच्या १०० मीटर परिसरात खालील प्रमाणे कृत्य करण्यास मनाई करण्यात आली आहे. हे आदेश परीक्षेच्या कामकाजासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांना लागू राहणार नाही.

## दिव्यांगत्व प्रमाणपत्र....

हक्क अधिनियम २०१६ मधील कलम ९१ नुसार कारवाई करावी तसेच त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करावी, त्याचप्रमाणे त्यांनी घेतलेल्या लाभांची वसुली करण्यात यावी. उक्त प्रमाणे कार्यवाही केल्यानंतर सुद्धा प्रशासकीय विभाग/नियुक्ती प्राधिकारी / आस्थापना अधिकारी हे एखाद्या दिव्यांग अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या दिव्यांगत्वाबाबत साशंक असतील तर अशा दिव्यांग अधिकारी/कर्मचाऱ्याचे दिव्यांगत्व तसेच दिव्यांगत्व प्रमाणपत्राची पडताळणी करण्याबाबतचे सर्वस्वी अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्यास असतील. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व आस्थापनांवरील दिव्यांग अधिकारी/कर्मचाऱ्यांचे दिव्यांगत्व आणि दिव्यांगत्व प्रमाणपत्राची पडताळणी करुन त्याचा अहवाल शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट–अ मधील विहित नमुन्यात संबंधित विभागांनी ३ महिन्यांत दिव्यांग कल्याण विभागास सादर करावा असे निर्देश दिलेले आहेत.

## जमिनीशी टच...

शिवसेनेची असलेली शहरांमधील मजबूत पकड भाजपाकडे नसलेले कणखर नेतृत्व आमदार प्रकाश सोळंके यांच्यावर असलेली शहरवासीयांची नाराजी , याचा फायदा शिवसेनेकडून सक्षम उमेदवार असणाऱ्या राधा तुकाराम येवले यांना निश्चितच मिळणार आहे. राधा येवले यांनी उपनगराध्यक्षपदी

◆ पान ४ वरून पुढे...

काम करत असताना शहरवासीयांची वीज पाणी रस्ते आधी कामे प्राधान्याने मार्गी लावलेली आहेत उच्चशिक्षित असणाऱ्या राधा येवले सर्वसामान्यांच्या उमेदवार म्हणून शहरवासीय निश्चितच भक्कमपणे साथ आणि समर्थन देतील. तुकाराम येवले यांचा कायम जमिनीशी टच आहे. नगरसेवक असो अथवा नसो कुठलेही पद असो अथवा नसो जनतेच्या कुठल्याही समस्यांचे निराकरण करणे हे मागील २५ वर्षापासून करत आहेत. भाजपा शिवसेना व बहुजन विकास मोर्चा चे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे अशी युती झाल्यास व शिवसेनेला नगराध्यक्ष पदाची संधी मिळाल्यास राधा येवले यांचा विजय निश्चितच होणार असे सर्वसामान्य मतदार आज खुले आम बोलताना दिसत आहेत. विरोधकांकडून कितीही धनदांडगा उमेदवार आला तरी देखील सर्वसामान्य उमेदवार म्हणून माजलगाव शहरवासी निश्चितच ओबीसीच्या महिला उमेदवार राधा येवले यांना शिवसेनेच्या नगराध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी देतील व माजलगाव नगरपालिकेवर निश्चितच भगवा फडकेल.

## हमीभाव सोयाबीन....

आहे. अतिवृष्टीमुळे सोयाबीन पिकाची उत्पादकता आणि गुणवत्ता दोन्हीवर परिणाम झाला. त्यातच बियाणे, खत, कीटकनाशक या वाढत्या खर्चाम ुळे शेतकरी आर्थिक कोंडीत सापडले. परिणामी, मिळेल त्या भावात – ₹३५०० ते ₹४१०० प्रति क्विंटल दराने – अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीन खाजगी व्यापाऱ्यांकडे विकले. शासनाची खरेदी अजून सुरूच झालेली नसल्याने, शेतकरी म्हणतात की – पोटाची भूक थांबत नाही; खरेदी केंद्र वेळेवर सुरू झाली असती, तर फायदा झाला असता. कारण हमीभाव केंद्रे उघडण्यापूर्वीच बाजारात माल विकला गेला, आणि उर्वरित शेतकरी तांत्रिक अडचणींमुळे नोंदणी करू शकलेले नाहीत. परिणामी या योजनेचा प्रत्यक्ष लाभ किती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल याबाबत लिंबागणेश येथील शेतकरी

◆ पान ४ वरून पुढे...

मोहन कोटुळे, अंकुश जाधव, रामचंद्र मुळे, प्रमोद निर्मळ, अनंत आमटे, अशोक खिल्लारे, अंकुश वाणी, साहेबराव ढवळे, आण्णा खिल्लारे, महादेव ढवळे आदींमध्ये संशय निर्माण झाला आहे.

## दुकानाचा पत्रा....

दोन मिक्सर असा एकूण ६३ हजार ४०० रु. चाक माल चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. बुधवारी ५ नोव्हेंबर २०२५ रोजी औदुंबर शिंदे यांनी केज पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारी नुसार अज्ञात चोरट्या विरुद्ध गु. र. नं. ६११/२०२५ भा. न्या. सं. ३०५(ए), ३३१(४) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस जमादार फुलचंद सानप हे तपास करीत आहेत.

## राष्ट्रवादी काँग्रेसकडून....

अर्ज दाखल केले आहेत, त्यांनी नियोजित वेळेत आणि योग्य कागदपत्रांसह मुलाखतीस उपस्थित राहावे. ही प्रक्रिया पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने होणार असून पक्षाचा बळकटीकरण व नगरपरिषदेस सक्षम नेतृत्व मिळवून देणे हा उद्देश आहे. नगरपालिका निवडणुका या केवळ राजकीय स्पर्धा नसून शहराच्या भविष्यास आकार देणाऱ्या महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहेत. शहरातील पाणीपुरवठा, रहदारी, स्वच्छता, रस्त्यांचे जाळे, मूलभूत सुविधा, नागरिक कल्याण, बाजारव्यवस्था यांसारख्या जीवनावश्यक कामांची जबाबदारी नगरपालिका व्यवस्थेवर असते. त्यामुळे सक्षम आणि विकासाभिमुख नेतृत्व निवडणे अत्यंत आवश्यक असल्याचेही शहराध्यक्षांनी नमूद केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थानिक विकासासाठी कटिबद्ध असून नगरपरिषदेत सक्षम प्रतिनिधित्वाद्वारे सातत्यपूर्ण विकासाचे ध्येय साध्य करणार असल्याचे अमर नाईकवाडे यांनी म्हटले आहे. सर्व इच्छुकांनी मुलाखतीसाठी वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहनही त्यांनी केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीत महाराष्ट्राला देशात सर्वात पुढे ठेवा – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीचा मुख्यमंत्र्यांनी घेतला आढावा ; नागपूर, वर्धा येथे नवीन कारागृहाचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीचा गुन्हे सिद्धतेमध्ये चांगला उपयोग होत आहे. या कायद्यांच्या प्रत्येक घटकातील अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्राला देशात सर्वात पुढे ठेवावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत आयोजित बैठकीत दिले. ज्या घटकातील अंमलबजावणीमध्ये राज्य मागे आहे, अशा घटकाच्या अंमलबजावणीमध्ये पुढील काळात महाराष्ट्र देशात अन्य राज्यांच्या तुलनेत अव्वल असण्याची अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.



बैठकीस गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ पंकज भोयर, गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, गुन्हा घडल्यानंतर जलद गतीने तपास पूर्ण करीत आरोपींना शिक्षा देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग या कायद्यांच्या अंमलबजावणीमधून करण्यात येत आहे. यामुळे निश्चितच जलद गतीने आरोपींना शिक्षा होत आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने नवीन फौजदारी कायद्यांची प्रभावीरित्या अंमलबजावणी करण्यात यावी. कायद्याच्या प्रत्येक घटकाची अंमलबजावणी करताना अन्य राज्यांशी तुलना करण्यात यावी. यावरून आपली स्थिती समजून ज्या घटकाच्या अंमलबजावणीत वेग घेणे आवश्यक आहे तो घेण्यात यावा. सीसीटीएनएस (क्राइम अँड क्रिमिनल ट्रेकिंग नेटवर्क अँड सिस्टीम्स) प्रणालीवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने नोंदविण्यात आलेले एफआयआर इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेच न्यायालयाकडे जावेत. ही प्रणाली गतीने कार्यान्वित करण्यात यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

# अखेर पालवण–लिंबागणेश रस्त्यावरील खड्ड्यांची दुरुस्ती; बेशरम लागवड आंदोलनानंतर मस्के कन्स्ट्रक्शनला आली जाग!

## दिशाभूल करणाऱ्या बातम्यांकडे दुर्लक्ष करा म्हणणारे राजेंद्र मस्के तोंडघशी पडले : डॉ. गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत बीड तालुक्यातील पालवण चौक ते लिंबागणेश या तब्बल २४ किमी लांबीच्या, १२ कोटी ७५ लाख रुपये खर्चून बांधलेल्या रस्त्यावरील खड्डे आणि भगदाड अखेर बुजविण्यात आले आहेत. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडल्यामुळे वाहनचालक व ग्रामस्थांचा जीव धोक्यात होता. या पार्श्वभूमीवर डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर)



आणि शिवशक्ती–भीमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली लिंबागणेश व पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी खड्ड्यात बेशरमांची लागवड आंदोलन करून कंत्राटदार आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात तीव्र संताप व्यक्त केला होता. या आंदोलनानंतर प्रसारमाध्यमांमध्ये बातम्या झळकल्या आणि रस्त्याच्या दुर्दशेची चर्चा लिंबागणेश परिसरात चांगलीच रंगली. त्यानंतर राजेंद्र मस्के यांनी दिशाभूल करणाऱ्या बातम्यांकडे दुर्लक्ष करा असा बचावात्मक पवित्रा घेत स्वतः च्या समर्थकांमार्फत बातम्या पसरवल्या होत्या. मात्र, दोनच दिवसांत मदन मस्के कन्स्ट्रक्शन मार्फत रस्त्यावरील भगदाड बुजविणे आणि पाणी साचलेल्या ठिकाणी मुरूम टाकण्याचे काम सुरू करण्यात आले.

**केविलवाणा प्रयत्न असफल ठरला – डॉ. गणेश ढवळे**

डॉ. ढवळे यांनी सांगितले की, आंदोलनाशिवाय प्रशासन आणि कंत्राटदार हलत नाहीत हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. लोकांच्या जीवाशी खेळणाऱ्या या निष्काळजी कारभाराविरोधात आम्ही लढलो आणि अखेर ग्रामस्थांचा विजय झाला. रस्त्याची दुरुस्ती पूर्ण झाल्याने ग्रामस्थांनी सुटकेचा श्वास सोडला असून आंदोलनकर्त्यांचे आभार मानले आहेत. स्थानिक नागरिकांनी पुढेही रस्त्याच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# राजिप शाळा वडगाव येथे वंदे मातरम गायन उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद उच्च प्रथमिक शाळा,वडगाव येथे भारताच्या राष्ट्रिय गीताच्या १५० व्या दिनानिमित्त शासन निर्देशानुसार आज सामुहिक गायन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री.सुभाष राठोड यांनी १८७५ ते २०२५ पर्यंत वंदे मातरम या राष्ट्रीयगीताचा इतिहास विद्यार्थ्यांसमोर उलगडला.यावेळी पदवीधर शिक्षिका मयुरी धायगुडे यांनी या गितगायन कार्यक्रमाचे संचालन करत मुलांना वंदे मातरम गीताचे ऐतिहासिक महत्त्व



पटवून सांगितले.कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ.राजश्री नरेंद्र जांभुळकर, मुख्याध्यापक सुभाष राठोड,पदवीधर शिक्षिका मयुरी धायगुडे,अंगणवाडी सेविका नीता राऊत,स्वयं सेवक संकेत काठोळे ,पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

**● गीताने व वंदे मातरम च्या घोषणेने भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात स्फुरण भरण्याचे मोठे कार्य केले आहे. आज त्या आठवणींमुळे नवीन पिढीला स्वातंत्र्याचे महत्त्व नक्की पटेल. –सुभाष राठोड मुख्याध्यापक शाळा वडगाव**

# 'आईसोबत पळून लग्न केलं अन् माझं...' पुतण्याचा काकावर राग अनावर, असा घेतला बदला

**नागपूर । प्रतिनिधी**

आईसोबत काकाने पळून लग्न केल्यामुळे माझं आयुष्य उद्धवस्त झाल्याचं सांगत पुतण्याने काकाला अतिशय गंभीर पद्धतीने संपवलं आहे. हा प्रकार अक्षरशः हादरवून टाकणारा आहे. पारडी पोलिस ठाण्याच्या हद्दीत हा प्रकार घडला आहे. २२ वर्षीय पुतणा कुणाल देवेंद्र कुंभारेने ४२ वर्षीय गोमा कृष्णराव कुंभारे याची क्रूरपणे हत्या केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी कुणालच्या आईचे काका गोमा कुंभारेसोबत




संबंध असून त्यांनी पळून जाऊन लग्न केलं होतं. काकानेच आईला पळवून नेल्यामुळे आपलं आयुष्य उद्धवस्त झाल्याची भावना आणि प्रचंड राग आरोपीच्या मनात होता. यामुळेच त्याने हे क्रूरकृत्य केल्याच सांगण्यात येत आहे. आरोपी कुणाल त्याच्या वडिलांसोबत राहतो. काकानेच आईला पळवून नेल्यामुळे घरात गुंतागुंतीचं आणि तणावाच वातावरण होतं. अशामध्ये आरोपी कुणाल काकाला सतत 'तुला पाहून घेईन' अशी धमकी देत असे. एक दिवस अखेर आरोपीने काकाला गाठलं अन् टोकाचं पाऊल उचललं. गुरुवारी दुपारी दोघांमध्ये वाद झाला त्यानंतर सायंकाळी काका घरात नसल्याचं पाहून तो घाटाजवळ पोहोचला. तिथे काका गोमा कुंभारे दिसताच त्यांच्यात पुन्हा वाद धाला. यावेळी संपाताच्या भरात कुणालने खिशातून चाकू काढून काकाच्या छातीवर, मान आणि पोटावर वार केल्याच पोलिसांनी सांगितलं.

# नाशिकमध्ये बिबट्याच्या हल्ल्यात ३५ वर्षीय तरुणाचा मृत्यू, छिन्न-विच्छिन्न अवस्थेत आढळला मृतदेह; ग्रामस्थ आक्रमक

**नाशिक । प्रतिनिधी**

पुणे पाठोपाठ नाशिक तालुक्यातील लोहशिंगवे गावात बिबट्याच्या हल्ल्यात ३५ वर्षीय सुदाम जुंदरे या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. पहाटे अंदाजे पाच वाजण्याच्या सुमारास ग्रामस्थांना गावाजवळ छिन्नविछिन्न अवस्थेत सुदाम जुंदरे यांचा मृतदेह आढळला. या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. बिबट्याला तत्काळ जेरबंद करण्याची मागणी करत ग्रामस्थ चांगलेच आक्रमक झाले आहेत. गेल्या काही दिवसांपासून लोहशिंगवे परिसरात बिबट्याचा



सतत वाढता संचार पाहायला मिळत आहे. यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. याआधीही नाशिक जिल्ह्यातील सिन्नर, देवळाली परिसरात बिबट्याच्या हल्लयांमुळे तिघांचा बळी गेला होता. सतत वाढत असलेल्या या घटनांमुळे वन विभागावर नागरिकांचा रोष व्यक्त होत आहे. त्यातच नाशिक तालुक्यातील लोहशिंगवे गावात बिबट्याने तरुणावर हल्ला केला. बिबट्याच्या हल्लात सुदाम जुंदरे या तरुणाचा मृत्यू झाला. स्थानिक नागरिकांना छिन्न–विच्छिन्न अवस्थेत तरुणाचा मृतदेह आढळून आला आहे. या घटनेनंतर ग्रामस्थ चांगलेच आक्रमक झाले आहेत. तत्काळ हल्लेखोर बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. याआधीही आजूबाजूच्या गावात बिबट्याच्या हल्लयाच्या घटना घडल्याने बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी ग्रामस्थांनी वन विभागाला धारेवर धरले. यावेळी बिबट्याला जेरबंद करण्यासाठी तत्काळ पिंजरा लावण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# फिरता नारळी श्री संत एकनाथ महाराज कृतार्थ श्री भावार्थ रामायण कथा शुभारंभ श्री हिंदू धर्मभूषण श्री धर्माचार्य अमृत आश्रम स्वामी जी महाराज यांच्या हस्ते शुभारंभ संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील श्रीक्षेत्र लिंबागणेश च्या जवळील असलेली श्रीक्षेत्र महाजन वाडी या ठिकाणी फिरता नारळी श्री संत एकनाथ महाराज कृतार्थ भावार्थरामायण कथेचा शुभारंभ मोठ्या उत्साहामध्ये आणि भक्तिमय आनंदमय वातावरणामध्ये श्री वेदशास्त्र संपन्न श्री हरिभक्त परायण श्री हिंदू धर्मभूषण श्री धर्माचार्य श्री अमृत आश्रम जी स्वामीजी महाराज धर्माचार्य यांच्या शुभहस्ते आज रोजी म्हणजेच दिनांक ६. ११ २०२५ रोजी गुरुवारी सायंकाळी साडेसात वाजता प्रदोष कालीन शुभ मुहूर्तावर मोठ्या उत्साहात या कथा शुभारंभाची सुरुवात झाली या वेळी येथे प्रमुख अतिथी म्हणून व श्री ईश्वर भक्त म्हणून उपस्थित असलेले देव



देश धर्म यासाठी सातत्याने कार्यरत असलेले व सर्वांच्या सुखदुःखामध्ये सातत्याने सहभागी होणारे असे भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली हा कथा शुभारंभ संपन्न झाल्यानंतर श्री धर्मगुरू श्री धर्माचार्य श्री अमृता आश्रम स्वामीजी जी महाराज यांनी अतिशय आनंद व्यक्त करत आपल्या आशीर्वाचनांमध्ये सांगितले की देव देश धर्म या साठी सातत्याने लोकांच्या सेवेमध्ये स्वतःला झोकुन घेणारे असे नेते मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील हे बीड जिल्ह्यामध्ये आहेत या बाबीचा मला फार आनंद वाटतो श्री नवनाथ अण्णांचे कार्य हे अतिशय उत्कृष्ट आहे मी करावे तेवढे त्यांच्या उत्कृष्ट धार्मिक व सामाजिक कार्याचे कौतुक कमीच आहे म्हणून मा श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांना उदंड आयुष्य लाभावे अशी मी श्री ईश्वरचरणी प्रार्थना करतो आणि त्यांच्या हातून असेच देव देश धर्म या साठी सातत्याने कार्य भविष्यात होत रावे अशी सदिच्छा व्यक्त करतो असे श्री धर्माचार्य श्री धर्मगुरू श्री अमृताश्रम जी स्वामी महाराजांनी आपल्या आशीर्वचन पर मा नवनाथ अण्णांच्या बाबतीत मनोगत व्यक्त करताना सांगितले नंतर हिंदू धर्मभूषण धर्माचार्य श्री अमृत आश्रम जी स्वामी जी जोशी नवगण राजुरी कर महाराजांचा सर्व गावकऱ्यांच्या वतीने मोठा आनंदाच्या वातावरणामध्ये श्री हनुमान मंदिरामध्ये सर्वत्र दिव्य दीप

# देवी भागवत कथेची उद्या सांगता; ह भ प अनंत शास्त्री गोंदीकर महाराजांच्या सुस्राव्य कथेसाठी भाविकांची गर्दी

**बीड । प्रतिनिधी**

येथील श्री दत्त मंदिर दत्तधाम या ठिकाणी गेल्या सहा दिवसापासून ह भ प वेदमूर्ती अनंत शास्त्री महाराज गोंदीकर यांच्या सुश्राव्य अशा देवी भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे या भागातील विलासराव रत्नपारखी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कथेला भाविकांची मोठी गर्दी असून उद्या रविवार दिनांक ९ नोव्हेंबर रोजी या कथेची सांगता असून यानिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे

दत्तधाम परिसरातील विलासराव रत्नपारखी यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ह भ प वेदमूर्ती अनंत शास्त्री महाराज गोंदेकर यांच्या



देवी भागवत कथेला दिनांक ३ नोव्हेंबर रोजी प्रारंभ झाला गेल्या सहा दिवसापासून दररोज दुपारी एक ते पाच या वेळेत मोठ्या संख्येने भाविकांची उपस्थिती होती या कथेनिमित्त अनेक मान्यवरांची उपस्थिती देखील होती. यावेळी ह भ प गोंदीकर महाराज म्हणाले की देवी भागवत कथेला खूप महत्त्व आहे,भक्तांना धर्म,अर्थ,काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांची प्राप्ती करून देते. ही कथा मन शुद्ध करते, संभ्रम दूर करते आणि शांती व मुक्ती मिळवून देते. या कथेच्या श्रवणाने नकारात्मकता नाहीशी होते आणि घरात दैवी आशीर्वाद मिळतात, तसेच आध्यात्मिक विकास साधला जातो. देवी भागवत कथेचे महत्त्व म्हणचे काय तर देवी भक्ती हा मुक्तीचा एकमेव मार्ग आहे, असे देवी भागवत मानते आणि त्यामुळे मोक्षप्राप्तीसाठी हा एक प्रभावी मार्ग आहे.कथा ऐकल्याने मन शुद्ध होते, संशय दूर होतात आणि बुद्धीला योग्य दिशा मिळते.

कथा श्रवण केल्याने घरात शुद्ध आणि सकारात्मक वातावरण निर्माण होते, नकारात्मक ऊर्जा दूर होते आणि दैवी कृपा प्राप्त होते. कथेच्या श्रवणाने व्यक्ती 'सर्वज्ञ' होते असे मानले जाते, ही देवी भागवताची एक महत्त्वाची फलश्रुती आहे. कथेमध्ये सृष्टीच्या उत्पत्तीची कथा आहे, ज्यामध्ये ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांच्या जन्माचे वर्णन आहे. देवी भागवत कथेचे हिंदू धर्मात,विशेषतः शाक्त संप्रदायात,अनन्यसाधारण महत्त्व आहे. हे महापुराण देवीलाच अंतिम सत्य (परब्रह्म) मानून तिच्या भक्तीचा महिमा सांगते.

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांकः ९१४ / २०२५**

**नामदेव बाळाभाऊ वाघमारे विरूध्द – निरंक**

ज्याअर्थी मयत नामे बाळाभाउ बाबुराव वाघमारे हे दिनांक २०.०८.२०२३ रोजी भेंडटाकळी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार– १. नामदेव बाळाभाऊ वाघमारे, वय ६० वर्षे, धंदा शेती, रा. भेंडटाकळी ता. गेवराई जि. बीड, २. धोंडाबाई बाळाभाउ वाघमारे, वय ८० वर्षे, धंदा – घरकाम, रा. भेंडटाकळी ता. गेवराई जि. बीड

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे...

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या ६ घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार व गैरअर्जदार यांना सदर मयत नामे बाळाभाउ बाबुराव वाघमारे रा. भेंडटाकळी ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०३.१२.२०२५
(मार्फत ॲड. बी के निकाळजे )

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर गेवराई

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती ए. बी. निवारे १० वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १६५३/२०२५**

**प्रकाश विरुध्द निरंक**

अर्जदार :–(१) प्रकाश सोपानराव जगताप, वय ६७ वर्षे, धंदा– शेती, रा. दत्त नगर, बीड ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत..

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत छाया प्रकश जगताप यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत छाया प्रकश जगताप यांचा मृत्यु दि. २९/१२/२०१८ रोजी थोरात हॉस्पीटल, अंबाजोगाई येथे झाला आहे. अर्जदार हे मयताचा पती आहे.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत छाया प्रकश जगता यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६ माहे नोव्हेंबर २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०३ डिसेंबर २०२५.
(ॲड. एस. बी. नांदे यांच्यामार्फत)

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शनिवार, दि. ०८ नोव्हेंबर २०२५ ● पान ४

# गेवराई नगराध्यक्ष पदासाठी सौ.शितलताई दाभाडे यांच्या उमेदवारीची अमरसिंह पंडित यांच्याकडून घोषणा

## माजी नगरसेवक विठ्ठल पवार यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीमध्ये पक्षप्रवेश

**गेवराई । प्रतिनिधी**

दहा वर्षे सत्ता असतानाही विरोधकांनी अतिक्रमण धारकांना हक्काचा पीटीआर दिला नाही, विजयसिंह पंडित आमदार झाल्यानंतर दहा महिन्यांत पीटीआर देण्याचे काम आम्ही केले. हक्काचा माणूस म्हणून अडीअडचणीत नागरीकांना उपलब्ध होणाऱ्या महेश दाभाडे यांच्या रुपाने सौ. शितलताई महेश दाभाडे यांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी देत




आहे. त्यांनाच प्रचंड मताधिक्याने विजयी करून सत्तेच्या लालसेने एकत्र आलेल्यांना धडा शिकवा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांनी केले. विठ्ठल पवार यांच्या पक्षप्रवेश सोहळ्यात अमरसिंह पंडित यांनी सौ.शितलताई दाभाडे यांच्या उमेदवारीची अधिकृत घोषणा केली.

गेवराई नगर परिषदेचे नगराध्यक्ष पद सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून माजी आमदार अमरसिंह पंडित कोणाला उमेदवारी देणार याकडे अनेकांचे लक्ष लागले होते. आज माजी नगराध्यक्ष विठ्ठल पवार यांच्यासह सहकाऱ्यांच्या पक्षप्रवेश सोहळ्यात अमरसिंह पंडित यांनी सौ.शितलताई महेश दाभाडे यांच्या उमेदवारीची अधिकृत घोषणा करून प्रचारात आघाडी घेतली आहे. यावेळी व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दिपक आतकरे, बाबासाहेब घोडके, राधेशाम येवले, जगन्नाथ काळे, एस.वाय.अन्सारी, भास्कर काकडे, कालिदास नवले, धम्म पाल सौंदरमल, किशोर कांडेकर, नागरे महाराज, शांतीलाल पिसाळ, शेख खाजाभाई, अरुण चाळक, विनोद सौंदरमल, सरवर पठाण, विजय सुतार, जे.के.बाबूभाई, रंजित घुंबार्डे, बंटी सौंदरमल, गजानन काळे, संतोष आंधळे यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यक्रमात माजी नगरसेवक विठ्ठल पवार, शाम रोकडे, दिलीप चोरमले, दादा बेदरे, प्रविण बेदरे, राजाभाऊ कांबळे, पवन साळुंके, राजू कांबळे, अंगद काळे, अशोक घुले, आकाश गोरे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला.

यावेळी माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे यांनी माजी आमदार लक्ष्मण पवार आणि त्रिंबक पवार यांचे नाव न घेता त्यांच्यावर टिका केली. जे स्वतःच्या बहिणीचे झाले नाहीत ते गेवराईकरांचे काय होतील ? असा

▶ उर्वरित पान २ वर

# थोडक्यात...

## वंदेमातरम १५० वर्षे निमित्त सामूहिक गान कार्यक्रम संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

वंदेमातरम या गीताला दीडशे वर्षे पूर्ण प्रित्यर्थ आज बीड येथे जिल्हा क्रीडा संकुल जालना रोड या ठिकाणी वंदेमातरम गीताचा सामूहिक गान कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात म्हटले प्रत्येकाच्या नसा-नसामध्ये वंदेमातरम हे असले पाहिजे. आज या गीता करिता शासकीय आयटीआय बीड व शासकीय आयटीआय मुलींची बीड या दोन्हींच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम घेण्यात आला त्याप्रसंगी सर्वच शाळांना आमंत्रित करण्यात आले होते. याप्रसंगी वंदे मातरम ह्या गीतावर राहुल नावंदर यांनी भाषण केले. ९ वाजून ५० मिनिटांनी सर्व शाळांनी व आयटीआयच्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी वंदेमातरम गीत गायले. त्याप्रसंगी गायक सुयोग खजिनदार यांनी आपल्या मधुर आवाजात गीत गायले. संस्थेचे प्राचार्य डॉ. उखळीकर मुलींच्या संस्थेचे प्राचार्य पंडित मुने, शिक्षणाधिकारी प्रिया पाटील, छत्रपती संभाजीनगर विभागाचे नागेश गलांडे, गंगाधरराव देशमुख, अमोल मुळे, उद्योजक टेके, अशोक नलावडे संस्थेचे उपप्राचार्य क्षीरसागर व सर्व गटनिदेशक शिल्प निदेशक उपस्थित होते सूत्रसंचालन श्री. सगळे व गीते यांनी केले.

## नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुका प्रसारमाध्यमांसाठी सनियंत्रण समिती गठित

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतीमधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहिर करण्यात आला असून बीड, माजलगाव, आंबाजोगाई, परळी वैद्यनाथ, गेवराई, किल्ले धारुर या नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या अनुषंगाने विविध प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, जाहिराती व प्रचारासंदर्भात नियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी. जिल्हा स्तरावर माध्यम प्रमाण व नियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीचे अध्यक्ष: जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, सदस्य सचिव जिल्हा माहिती अधिकारी, सदस्य जिल्हा पोलीस अधिक्षक, उपजिल्हाधिकारीसमन्वय (भुसंपादन), संबधित निवडणूक निर्णय अधिकारी, संबधित नगरपरिषदेचे मुख्यधिकारी हे असून सदर समितीने निवडणूक कालावधीत माध्यमांवर प्रसिद्ध होणाऱ्या सर्व निवडणुकीसंबंधी विषयांवर देखरेख ठेवून आवश्यक ती कारवाई करण्यासाठी ही समिती गठित करण्यात आली आहे.

## सौ.के.एस.के.महाविद्यालयात वंदे मातरम् गीताचे गायन संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात आज दिनांक ०७/११/२०२५ रोजी वंदेमातरम् या गीताच्या निर्मितीला १५० वर्ष पूर्ण झाले असून त्या अनुषंगाने महाविद्यालयाच्या प्रांगणात सामुहिकरित्या वंदेमातरम् या गीताचे गायन संपन्न झाले. या गीताची रचना ऋषि बंकीमचंद्र चट्टोपध्याय यांनी केली. भारतमातेच्या संपन्नतेचे वर्णन करणारे विविधतेने नटलेल्या भारतभूला वंदन करणारे हे गीत सर्व भारतीयांचा अभिमान वाढवणारे असे आहे. या गीत गायन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ.अनिता शिंदे,कमवि उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे,पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर,एनसीसी प्रमुख बालासाहेब पोटे तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी,बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## गांधनपुरा येथे तरुणावर चाकू हल्ला ; सहा जणांविरुद्ध गुन्हा

**माजलगाव । प्रतिनिधी**



शहरातील गांधनपुरा येथे एका तरुणावर सहा जणांनी एकत्रित हल्ला करून चाकूने जखमी केल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी पोलिसांनी सहा जणांविरुद्ध मारहाण, धमकी आणि शस्त्रास्त्र बाळगण्याचा गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी शकील मिया कुरेशी (वय ४९ वर्षे, व्यवसाय शेती, रा. गांधनपुरा, माजलगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दिनांक ९ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री सुमारे १०.३० वाजता त्यांचा भाचा मोहम्मद फैजान जमील कुरेशी हा गांधनपुरा परिसरात असताना आरोपी अरबाज बेग, मुर्तुज बेग, इमान बेग, अनिस बेग, अकबर बेग आणि आसेफ बेग (सर्व रा. गांधनपुरा) यांनी त्याच्यावर हल्ला केला.प्रथम आरोपी अरबाज बेग याने मोटारसायकलने कट मारून वाद घातला आणि नंतर फोनवरून इतर साथीदारांना बोलावून घेतले. त्यानंतर आरोपी मुर्तुज बेग याने चाकू काढून फैजानच्या दोन्ही पायांवर वार करून गंभीर दुखापत केली. तर इमान, अनिस, अकबर आणि आसेफ यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली आणि जिवे मारण्याची धमकी दिली. या घटनेत फैजान आणि जैद कुरेशी हे दोघे जखमी झाले आहेत.या प्रकरणी माजलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास पोउपनि राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.



*मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड अंतर्गत मौज गाव ता.जि.बीड येथे विद्यार्थी दिवस साजरा करण्यात आला.विद्यार्थी ना त्यांच्या सुलभ भयुष्यासाठी विशाल डोळस यांनी मार्गदर्शन केले यावेळी सर्व विद्यार्थी ना स्कूल बॅग,वही,पेन,पेन्सिल देण्यात आले या वेळी उपस्थित मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे उपाध्यक्ष विशाल डोळस, कोषाध्यक्ष अमोल अडाणे, व सदस्य सुदर्शन भोसले उपस्थित होते.*

# लुखेगाव सिंदफणा नदीकाठचे खरडून गेलेले जमिनीचे पंचनामे करण्यात आले

**माजलगाव । प्रतिनिधी**

सिंदफणा नदीला पाण्याचा पूर आल्यामुळे लुखेगाव सिंदफणा नदीकाठच्या खरडून गेलेले शेतकऱ्यांचे पंचनामे करताना तलाठी,एम पी सुतारे मॅडम, ग्राम सेवक महेश गेंदले, कृषी सहाय्यक बनसोडे मॅडम, यांनी शेतकऱ्यांच्या गट नंबर मध्ये जाऊन दिनांक ७ व ८/ऑक्टोंबर २०२५ रोजी जायम क्यावर समक्ष जाऊन पंचनामे केलेले अँगल कॅम्प च्या फोटो सहित आहे. ज्या शेतकऱ्यांनी खोटे पंचनामे



झाले असा अर्ज उपविभागीय अधिकारी माजलगाव यांना दिला त्याच शेतकऱ्यांच्या गट नंबर मध्ये जाऊन फोटो काढून पंचनामे केलेले आहे. तरी पण जलसमाधी आंदोलन दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ रोजी करू असा इशारा देण्यात आला आहे . लुखेगाव येथील सर्वच शेतकऱ्यांच्या गट नंबर मध्ये जाऊन स्पॉट पंचनामे केलेले आहे तलाठी ग्रामसेवक कृषी सहाय्यक यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून व शेतातील शेतकऱ्यांच्या सोबत अँगल कॅम मध्ये फोटो काढून पंचनामे केलेले आहे तरीपण काही चुकीचे खोटे आरोप करण्यात आलेले आहे असे तलाठी सुतारे मॅडम,ग्राम सेवक महेश गेंदले,कृषी सहायक बनसोडे मॅडम , यांनी सांगितले आहे शेतकऱ्यांचे पंचनामे केलेल्या अँगल कॅम्प च्या फोटोसहीत पंचनामा करतांना दिसत आहे.

# परिक्षा केद्राच्या परिसरात कलम १६३ मनाई आदेश

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परिक्षा २०२५ ही दि.०९ नोव्हेंबर २०२५ रोजी दोन सत्रात बीड जिल्हा केंद्रात खालील प्रमाणे एकुण पुढीलप्रमाणे (०८) उपकेंद्रामधून घेण्यात येणार आहे.

परीक्षा केंद्राचे नाव, विद्यार्थी संख्या- चंपावती माध्यमिक विद्यालय, नगर रोड, बीड विद्यार्थी २४०,चंपावती इंग्लिश स्कूल, नगर रोड, बीड २४०, भगवान विद्यालय, धानोरा रोड, बीड २८८,शिवाजी विद्यालय, कॅनॉल रोड, बीड २८८,सौ. के. एस. के. महाविद्यालय, शिवाजी नगर, बीड २४०,संस्कार विद्यालय नविन भाजी मंडई बीड २८८,श्री. छत्रपती शाहू माध्यमिक विद्यालय, बीड २४०, चंपावती प्राथमिक विद्यालय नगर रोड बीड २४० एकूण दोन हजार ४० विद्यार्थी सदर परीक्षा शांततेत व सुरळीत पार पाडणेच्या दृष्टीने वरील यादीप्रमाणे परीक्षा उपकेंद्राचे १०० मीटर परीसरात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे

▶ उर्वरित पान २ वर

# दिव्यांगत्व प्रमाणपत्र / वैश्विक ओळखपत्र तपासणी करून अहवाल सादर करावा

**बीड । प्रतिनिधी**

राज्य शासनामार्फत विविध शासकीय/निमशासकीय व इतर सर्व प्राधिकरणे/संस्था इ. मध्ये पदभरतीसाठी अर्ज घेताना दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित असलेल्या जागांसाठी संबंधित दिव्यांग व्यक्तीच्या वैश्विक ओळखपत्राचा क्रमांक नोंदविणे तसेच प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे अनिवार्य करण्यात आले आहे.

तसेच सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व आस्थापना/ विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख तसेच स्वायत्त संस्था यांना त्यांच्या आस्थापनेवर दिव्यांग आरक्षणांतर्गत सेवेत असलेल्या अधिकारी/कर्मचा-यांबाबत पुढीलप्रमाणे कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. जे दिव्यांग अधिकारी/कर्मचारी दिव्यांग आरक्षणांतर्गत नियुक्ती, पदोन्नती व अन्य शासकीय योजनांचा आणि सवलतींचा लाभ घेत आहेत, अशा सर्व दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांनी दिव्यांगत्व प्रमाणपत्र/वैश्विक ओळखपत्र सादर केले आहे किंवा नाही याची तपासणी करून त्यांच्या दिव्यांगत्वाची पडताळणी करण्यात यावी. ज्या दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांनी दिव्यांगत्व प्रमाणपत्र / वैश्विक ओळखपत्र सादर केले नाही. पडताळणीअंती ज्यांचे दिव्यांगत्वाची टक्केवारी लाक्षणिक दिव्यांगत्वापेक्षा (४०%) कमी आहे. क) शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्याकडे चुकीचे अथवा बोगस दिव्यांगत्य प्रमाणपत्र / वैश्विक ओळखपत्र आढळून आल्यास अशा सर्व अधिकारी/ कर्मचा-यांविरुध्द दिव्यांग व्यक्ती

▶ उर्वरित पान २ वर

# जमिनीशी टच असणारा सर्वसामान्यांचा उमेदवार राधा तुकाराम येवले

## शिवसेनेचा उच्चशिक्षित सक्षम उमेदवार ; उपनगराध्यक्ष पदाचा अनुभव

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील नगरपालिकेमध्ये कायम भाजप शिवसेनेच्या बाजूने मतदारांनी कायम कौल दिलेला आहे. तर विधानसभा लोकसभा निवडणुकीत देखील माजलगाव शहरातून भाजप शिवसेनेच्या उमेदवारास मताधिक्य मिळते. होऊ घातलेल्या नगरपालिका निवडणुकीमध्ये शिवसेनेकडून सक्षम उमेदवार म्हणून उपनगराध्यक्ष पदाचा अनुभव असणाऱ्या व जनतेशी कायम



संपर्कात असणाऱ्या राधा तुकाराम येवले या ओबीसी महिला उमेदवारास थेट जनतेतून नगराध्यक्ष होण्याची संधी मिळणार आहे.

नगरपालिका निवडणुकीचा बिगुल वाजल्यानंतर महायुती व शरदचंद्र पवार पक्ष यांच्याकडून नगराध्यक्ष पदाचा उमेदवार व २६ नगरसेवकांची चाचपणी सुरू आहे. अनेकांनी तर सोशल मीडियाच्या माध्यमातून आपापले प्रभाग निश्चित केले आहेत. ४१ हजार मतदार माजलगाव नगरपालिका निवडणूक मध्ये मतदानाचा हक्क बजावणार आहेत. जातीय समीकरणे

▶ उर्वरित पान २ वर

# हमीभाव सोयाबीन खरेदी केंद्रे शेतकऱ्यांसाठी की व्यापाऱ्यांसाठी ? : डॉ.गणेश ढवळे

## हमीभाव खरेदीसाठी शेतकऱ्यांकडून नोंदणी सुरू ; पण बहुतांश शेतकरी आधीच विक्री करून बसले

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाच्या मंजुरीनंतर २०२४-२५ हंगामासाठी हमीभाव खरेदी योजना सुरू केली असली, तरी प्रत्यक्षात या योजनेचा लाभ शेतकऱ्यांपेक्षा व्यापाऱ्यांनाच अधिक मिळणार का? असा प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात निर्माण झाला आहे. राज्यातील सोयाबीन, उडीद



आणि मुग या प्रमुख पिकांच्या हमीभाव खरेदीसाठी शासनाने ३० ऑक्टोबरपासून ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू केली असून १५ नोव्हेंबरपासून प्रत्यक्ष खरेदी केंद्रांवर प्रक्रिया सुरू होणार आहे. मात्र जिल्ह्यातील वास्तव वेगळेच आहे - कारण अतिवृष्टी आणि आर्थिक अडचणींमुळे बहुतांश शेतकऱ्यांनी आपला माल आधीच खाजगी व्यापाऱ्यांना विकून टाकला ▶ उर्वरित पान २ वर

# दुकानाचा पत्रा कापून 63 हजाराच्या इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंची चोरी

**केज । प्रतिनिधी**

रात्रीच्या वेळी दुकानात कोणी नसल्याची संधी साधून चोरट्यांनी दुकानाच्या मागील बाजूचा पत्रा कापून आतील टीव्ही, पंखे व मिक्सर असे ६३ हजार ४०० रु. च्या इलेक्ट्रॉनिक्स वस्तू चोरीला गेल्या आहेत. या बाबतची माहिती अशी की, बोरगाव तालुका केज येथील औदुंबर दत्त शिंदे यांचे श्री बालाजी इंटरप्रायजेस नावाचे इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनिक्स वस्तू विक्रीचे मस्साजोग येथे दुकान आहे. ३ नोव्हेंबर रोजी त्यांनी रात्री ८:३० वाजता ते रोजच्याप्रमाणे दुकान बंद करून व दुकानाला कुलूप लावून त्यांच्या गावी गेले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी दि. ४ नोव्हेंबर रोजी सकाळी वाजता ९:०० वाजता त्यांनी दुकान उघडले असता त्यांना काउंटरवर हिशोबाच्या वह्या आणि पेन व इतर वस्तू या अस्ताव्यस्त पडलेल्या आढळून आल्या. त्यांनी दुकानाची व आतील मालाची पाहणी केली असता दुकानाच्या पाठीमागील बाजूचा पत्रा कापून ५ एलइडी टीव्ही, ३० सीलिंग फॅन आणि ▶ उर्वरित पान २ वर

# राष्ट्रवादी काँग्रेसकडून ९ नोव्हेंबर रोजी निवडणूक लढविणाऱ्या इच्छुकांच्या मुलाखती

## सर्वांनी उपस्थित राहण्याचे शहराध्यक्ष अमर नाईकवाडे यांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपरिषद निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे उमेदवार निवडीची प्रक्रिया सुरू झाली आहे. याअंतर्गत नगरपरिषद निवडणुकीत पक्षाकडून उमेदवारी इच्छुक असलेल्या व्यक्तींनी दाखल केलेल्या अर्जांच्या अनुषंगाने मुलाखतींचे आयोजन करण्यात आले आहे.



या मुलाखती दि. ९ नोव्हेंबर २०२५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालय, छत्रपती कॅपिटल, मित्र नगर, बीड येथे आयोजित करण्यात आल्या आहेत. सर्व इच्छुकांनी मुलाखतीसाठी पक्ष कार्यालयात ९ नोव्हेंबर रविवारी सकाळी साडेदहा (१०:३०) वाजता उपस्थित राहावे असे आवाहन शहराध्यक्ष अमर नाईकवाडे यांनी केले आहे. या मुलाखतीदरम्यान पक्षाचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी व निरीक्षक उपस्थित राहणार असून या प्रक्रियेद्वारे प्रत्येक विभागात सक्षम, समाजाभिमुख आणि विकासाभिमुख चेहरे पुढे आणण्यावर भर दिला जाणार आहे.

शहराध्यक्ष अमर नाना नाईकवाडे यांनी माहिती देताना सांगितले की, ज्या इच्छुकांनी उमेदवारी ▶ उर्वरित पान २ वर

### इच्छुक उमेदवारांचा तुफान प्रतिसाद

**१ ते ७ नोव्हेंबर दरम्यान इच्छुक उमेदवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे उमेदवारीसाठी अर्ज भरून दिले होते. नगरसेवक पदाची निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या तब्बल २६७ उमेदवारांनी व ३३ नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी आपले अर्ज पक्षाकडे जमा केलेले आहेत. या सर्व उमेदवारांच्या मुलाखती रविवारी ९ नोव्हेंबर रोजी सकाळी (१०:३०) वाजल्यापासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयामध्ये घेतल्या जाणार असल्याचे शहराध्यक्ष अमर नाईकवाडे यांनी कळविले आहे.**